# Clarity on upcoming academic calendar likely this week

File photo



The committee is not able to take a call yet

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** Stakeholders associated with the Shivaji University, Kolhapur (SUK), who are awaiting clarity on the upcoming academic calendar for semester and entrance examinations across Sangli, Satara and Kolhapur districts, are likely to get an update soon.

SUK vice-chancellor Devanand Shinde, who is also one of the members of the state government-appointed panel to submit a report on the academic calendar and examinations, told **TOI** that they are working tirelessly on the report that is likely to be submitted within next two days.

"Considering the varied situation across the state, it will be very difficult to form a uniform academic calendar for all state universities, even though we are trying to make it more consolidated," he said.

According to Shinde, once the report is submitted to the state government, the next decision on its overall recommendation implementations will be directed by the Higher and Technology education department of the state government.

He said that the committee is finding itself in a tricky situation considering many districts have varied situations of the contagion locally.

"Under SUK's jurisdiction Satara district falls in red zone, while Kolhapur and Sangli are in orange zone. The activities need to be planned according to the movement allowed in these respective zones," Shinde said.

The University Grants Commission (UGC) earlier last week had issued guidelines for higher education. Meanwhile, Kolhapur district primary education officer Asha Ubale told **TOI** that no private school can demand any kind of fees upfront until the admission process begins.

"Parents encountering such situation can complain directly to the education department and appropriate action will be initiated," she said.

# कोविड रुग्णालयासाठी १०० बेड

## भाजप-महाडिक परिवाराची भेट; जिल्हाधिकाऱ्यांनी केला स्वीकार



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कोविड रुग्णालयासाठी शंभर बेड देताना माजी खासदार धनंजय महाडिक, शेजारी जिल्हाधिकारी दौलत देसाई, आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी व इतर.**

कोल्हापूर, ता. ६ : जिल्ह्यात कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी शिवाजी विद्यापीठात उभारलेल्या कोविड रुग्णालयासाठी आज माजी खासदार धनंजय महाडिक कुटुंबीय व भारतीय जनता पक्षातर्फे १०० बेड देण्यात आले. जिल्हाधिकारी दौलत देसाई, आयुक्त मल्लिनाथ कल्लशेट्टी यांनी या मदतीचा स्वीकार केला.

महाराष्ट्रासह देशात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने शासन स्तरावर विविध उपाय योजले जात आहेत. त्या तुलनेत कोल्हापुरात कोरोना व्हायरसला रोखण्यात चांगले यश आले आहे. त्यासाठी गेला दीड महिना जिल्हा प्रशासन अहोरात्र काम करीत आहे. खबरदारीचा उपाय म्हणून शिवाजी विद्यापीठ आणि संजय घोडावत विद्यापीठ अशा दोन ठिकाणी प्रत्येकी १०० बेडची कोरोनाची अद्ययावत रुग्णालये उभी करण्याचा प्रशासनाने निर्णय घेतला आहे. त्यासाठी समाजातील दातृत्वशील व्यक्ती आणि संस्थांनी मदत करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी देसाई यांनी केले होते. त्यांच्या या आवाहनाला भाजप आणि महाडिक परिवाराने सर्वप्रथम प्रतिसाद दिला आणि या रुग्णालयासाठी बेड देण्याची घोषणा केली.

> **शिवाजी विद्यापीठातील रुग्णालयात सेमी अतिदक्षता विभाग, ऑक्सिजन अशा सुविधा असणार आहेत. महाडिक परिवाराकडून मिळालेल्या बेडमुळे हॉस्पिटल उभारणी अधिक वेगाने होणार असून, रुग्णांची मोठी सोय होणार आहे. त्यामुळे महाडिक कुटुंबीयांकडून जिल्हा प्रशासनाला मिळालेली मदत लाखमोलाची आहे.**
> **- दौलत देसाई,** जिल्हाधिकारी

आज भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष धनंजय महाडिक यांनी जिल्हाधिकारी देसाई यांच्याकडे १०० बेड सुपूर्द केले. कोरोनाची लढाई लढण्यासाठी महाडिक परिवाराने जिल्हा प्रशासनाला दिलेला शब्द पूर्ण केला आहे. यापुढेही प्रशासनाला लागेल ती मदत करण्यासाठी भाजप आणि महाडिक परिवार आपल्या सोबत असेल, असे आश्वासन प्रदेश उपाध्यक्ष महाडिक यांनी प्रशासनाला दिले.

माजी आमदार अमल महाडिक, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता रोहित बांदिवडेकर, उपअभियंता प्रशांत कांबळे, मिलिंद किटवाडकर, भाग्यश्री परब, अनिकेत शिर्के, अनिल जाधव, प्रवीण पारकर, नगरसेवक सत्यजित कदम, विजय सूर्यवंशी, विश्वराज महाडिक, समीर सेठ, इंद्रजित जाधव यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# चला, पंचगंगा अशीच ठेवूया नितळ!

**सुधाकर काशीद :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : लॉकडाउननंतर पंचगंगेत प्रदूषित टक मिसळण्याचे कमी झालेले माण व त्यामुळे नितळ झालेले चगंगेचे पात्र, याचा तीन तव्यांवर अभ्यास करण्यासाठी आज पंचगंगेच्या पाण्याचे नमुने सहाव्यांदा तपासण्यासाठी घेतले. महिन्याभरात दर पाच दिवसांनी नमुने घेतले जात आहेत. पाण्यातील भौतिक, रासायनिक, जैविक बदल तपासले जात आहेत. लॉकडाउननंतर नितळ झालेले पंचगंगेचे पाणी यापुढेही तसेच कायम राहावे, यासाठी या सर्वेक्षणातून उपाययोजना राबविली जाणार आहे. प्रशासनाबरोबर पंचगंगा नितळ ठेवण्याची जबाबदारी नागरिकांचीही आहे.



कोल्हापूर : लॉकडाउनच्या काळात पंचगंगेचे स्वच्छ दिसू लागलेले पाणी.

मुख्य पात्रच नव्हे; तर पंचगंगा ज्या नद्यांच्या संगमातून तयार झाली आहे अशा कुंभी, कासारी, तुळशी, भोगावती या नद्यांच्या पाण्याचे नमुनेही तपासणीसाठी घेतले जात आहेत. शिवाजी विद्यापीठ पर्यावरण विभाग, महापालिका पर्यावरण विभाग, प्रदूषण नियंत्रण मंडळ हे काम करत आहेत. पालकमंत्री सतेज पाटील, जिल्हाधिकारी दौलत देसाई, आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल यांनी कोरोना संसर्ग उपाययोजनांबरोबर पंचगंगा नदी सद्यस्थितीत आहे तशी पुढेही राहील, यासाठी हे काम स्वतंत्रपणे सुरू केले आहे.

आतापर्यंतच्या नमुन्यातून पाणी नितळ झाले आहे. नदीमार्गात येणाऱ्या सांडपाण्याचे प्रमाणही कमी झाले आहे. काही सांडपाण्याचे नाले कोरडे पडलेत. पाण्यात प्राणवायूचे प्रमाण वाढले आहे. जलपर्णींचा थर जवळजवळ संपलाच आहे. पाण्याचा रंग तेरवाड बंधाऱ्यापुढे काहीसा हिरवट; पण अन्य ठिकाणी नितळ झाला आहे, असे प्राथमिक निष्कर्ष आहेत. अर्थात, त्याला अंतिम स्वरूप येण्यास आणखी काही निरीक्षणांची गरज लागणार आहे.

विद्यापीठ पर्यावरणशास्त्र विभागाचे डॉ. पी. डी. राऊत, महापालिका पर्यावरण विभागाचे समीर व्याघ्रांबरे, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी प्रशांत गायकवाड, पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड नमुने घेण्याच्या कामात प्रत्यक्ष सहभागी आहेत.

नमुन्यांचे परीक्षण करून अंतिम अहवाल तयार होणार आहे. पंचगंगेच्या पात्रात अगदी क्वचित ठिकाणी नैवेद्य सोडला आहे. एरवी मुख्य घाट नैवेद्याने भरलेला असतो. पात्र इतके नितळ आहे की, काठावर चार-पाच फूट खोल पाण्याचा तळ स्पष्टपणे दिसतो. काठावर जलचर पक्ष्यांचा वावर वाढला आहे.

### नमुने घेण्यात येणारी ठिकाणे

- पंचगंगा मुख्य घाट
- राजाराम बंधारा
- आसुर्ले-पोर्ले बंधारा
- खडक कोगे
- बहिरेश्वर
- हळदी बंधारा
- प्रयाग संगम
- शिरोली पूल
- रुई बंधारा
- शिरोळ बंधारा
- तेरवाड बंधारा

# पाच कोटींच्या निधीला ब्रेक

## शिवाजी विद्यापीठाच्या वेतनापोटी एक, तर बांधकामाच्या चार कोटींत कपात

**करोना इफेक्ट**

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर


### सुवर्णमहोत्सवी वर्षासाठीच्या ४६ कोटी निधीला कात्री?

शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त २०१२ ला राज्य सरकारने ५० कोटी निधी देण्याची घोषणा केली होती. त्यावेळी राज्यात काँग्रेस व राष्ट्रवादी आघाडीचे सरकार होते. गेल्या सात वर्षांत सरकारने ५० कोटींपैकी केवळ चार कोटी निधीच दिला आहे. उर्वरित ४६ कोटी निधीबाबत विद्यापीठ प्रशासनाने सातत्याने पाठपुरावा केला. मात्र अद्यापही तो मिळालेला नाही. तसेच भरतीप्रक्रिया बंदीमुळे विद्यापीठाने रोजंदारी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. परिणामी विद्यापीठाच्या स्वनिधीवर ताण येत आहे. सध्याच्या करोनामुळे निर्माण झालेल्या आर्थिक बोजामुळे विद्यापीठाला जाहीर झालेला सुवर्णमहोत्सव विशेष निधी मिळेल की नाही याबाबत प्रश्नचिन्ह आहे.



शिवाजी विद्यापीठासाठी राज्य सरकारकडून दरवर्षी २४ कोटी निधीचा येतो. यातील बहुतांशी निधी वेतन आणि बांधकामासाठी खर्च होते. करोनाच्या पार्श्वभूमीवर मार्च महिन्याच्या वेतनात श्रेणीनुसार ५० ते ७५ टक्के वेतन कपातीमुळे एक कोटी तर बांधकाम प्रस्तावांचे चार कोटी अशा पाच कोटींच्या निधीला ब्रेक लागला आहे.

राज्य सरकारच्या नियोजन आराखड्यानुसार येत्या वर्षासाठी राज्याच्या निधी वितरणात ६७ टक्के कपातीचा निर्णय घेतला आहे. करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर गेल्या दीड महिन्यांपासून बंद असलेले जनजीवन, आर्थिक चक्र व करोनासाठी वैद्यकीय यंत्रणा व आरोग्य सुविधांवर होणारा खर्च वाढल्याने ३३ टक्केच निधी सरकारकडून विविध घटकांना मिळणार आहे. मात्र शिवाजी विद्यापीठ स्तरावर यूजीसी, रुसा, स्टाइड यांच्यामार्फत शैक्षणिक विकास व पायाभुत सुविधांसाठी येणाऱ्या निधीला कात्री लागलेली नाही. तर राज्याकडून वेतनासाठी देण्यात येणारा मंजूर निधीही प्राप्त झालेला आहे. परिणामी करोनाच्या पार्श्वभूमीवर वेतन कपातीबाबत निश्चित केलेल्या श्रेणीनुसार पगाराची




कपात केलेल्या रक्कम निधीला राज्य सरकारच्या पुढील आदेशापर्यंत ब्रेक लागला आहे.

दरम्यान राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रूसा) अंतर्गत २२ कोटी रुपयांची विकासकामे मार्गी लागली आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून येणाऱ्या निधीत कोणतीही कपात करण्याचे परिपत्रक विद्यापीठ प्रशासनाला पाठवले नसल्याने निधी कपातीचा आर्थिक फटका विद्यापीठाला बसणार नाही असे चित्र आहे.

### २२ कोटी रुपयांची कामे मार्गी

रुसातर्फे शिवाजी विद्यापीठात विविध विकास कामांचे नियोजन केले होते. यासाठी प्रस्ताव दिलेल्या निधीला मंजुरी मिळून निधी प्राप्त झाला असल्याने यापैकी कोणतीही कामे थांबणार नसल्याचे स्पष्ट आहे. शिवाजी विद्यापीठातील पाणीपुरवठा यंत्रणेसाठी एक कोटीचा निधी मंजूर झाला होता. तसेच विद्यापीठातील ऑडिटेरियमच्या नूतनीकरणासाठी एक कोटींचा निधी मिळाला आहे. विद्यापीठातील काही अधिविभागात व्हर्च्युअर क्लासरूम करण्यात आल्या असून त्यासाठी ५ कोटी रुपयांचा निधी खर्च केला आहे. विद्यापीठाच्या मुख्य गेटसमोरील आवारात असलेल्या शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे सुशोभिकरणही रुसांतर्गत आलेल्या निधीतून सुरू आहे.

एकूण सव्वा कोटी रुपयांच्या या कामातील पुतळ्याच्या बाह्य सुशोभिकरणाचे ४५ लाख रुपयांचे काम होणे बाकी आहे. मंजूर निधी प्राप्त झाला असल्याने काम रखडणार नाही. विद्यापीठ आवारात विहिर बांधकामही सुरू आहे. २५ लाख रुपयांचा निधी यासाठी मिळाला असून येत्या वर्षांत हे काम पूर्ण होणार आहे. गेल्या तीन वर्षांत २२ कोटी निधीतून विकासकामे मार्गी लागली आहेत. तर यंदाच्या रुसा निधीतील ७ लाख रूपये शिल्लक आहेत.

# 'राज्यशास्त्र'तर्फे ऑनलाइन चर्चासत्र

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभाग व नेहरु अभ्यास केंद्र यांच्यावतीने १० मे रोजी ऑनलाइन राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्रातील नव सामाजिक चळवळ' या विषयावर चर्चा होईल. यासाठी विविध विषयावर संशोधन पेपर मागवण्यात आले आहेत. यामध्ये भारतातील नव सामाजिक चळवळी, नेहरूवादी नव सामाजिक चळवळ , स्वतंत्र विदर्भ चळवळ, सहकार चळवळ व शैक्षणिक चळवळ, करोना संकट समस्येचे आंतरराष्ट्रीय परिणाम, वसंतदादा पाटील व सहकार चळवळ, कर्मवीर भाऊराव पाटील व शैक्षणिक चळवळ, धर्मनिरपेक्ष चळवळ, पंडित नेहरू आणि राष्ट्र उभारणी, बापूजी साळुंखे व शैक्षणिक चळवळ, राजारामबापू पाटील व सहकार चळवळ, विज्ञानवादी चळवळ, विकासाचा असमतोल आणि स्वतंत्र राज्यांची मागणी या विषयावर संशोधनपत्रांचे वाचन होणार आहे.

लोकमत

## महत्त्वाचे

# अप्पासाहेब पवार यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ सेवक संघाच्या वतीने मंगळवारी (दि. ५) शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरु डॉ. अप्पासाहेब पवार यांची ११४ वी जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठातील अतिथिगृहाजवळील डॉ. अप्पासाहेब पवार यांच्या पुतळ्यास व मुख्य इमारतीमधील छायाचित्राला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यापीठ सेवक संघाचे अध्यक्ष बाबा सावंत, राम तुपे, शशिकांत साळुंखे, सुनील जाधव, अनिल साळोखे, अजय आयरेकर उपस्थित होते.

# राज्यशास्त्रतर्फे ऑनलाईन आंतरराष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभाग आणि नेहरू अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. 'महाराष्ट्रातील नव-सामाजिक चळवळ' या विषयावर हे व्याख्यान असून ते ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. रविवारी (१० मे) हे अधिवेशन होणार असून यामध्ये राज्यभरातून शोधनिबंध सादर केले जाणार आहेत. महाराष्ट्रातील नव-सामाजिक चळवळ (१९८० ते २०२०) असे चर्चासत्र होणार असून त्यामध्ये भारतातील नव सामाजिक चळवळी, नेहरूवादी नव सामाजिक चळवळी, सहकार चळवळ व शैक्षणिक चळवळ, कोरोना संकट व त्याचे विविधांगी परिणाम या उपविषयांवर शोधनिबंध सादर केले जातील.

# करोना रुग्णालयासाठी शंभर बेड

म. टा. प्रतिनिधी,कोल्हापूर

करोना संशयित तसेच बाहेरील शहरातून येणाऱ्या नागरिकांना संस्थात्मक विलगीकरण करण्यासाठी शिवाजी विद्यापीठात रुग्णालयाची स्थापना करण्यात आली आहे. या रुग्णालयासाठी भारतीय जनता पक्ष व माजी खासदार धनंजय महाडिक परिवाराच्यावतीने विद्यापीठातील प्रस्तावित करोना रुग्णालयासाठी शंभर बेड मदत स्वरूपात प्रदान करण्यात आले.

जिल्हाधिकारी दौलत देसाई आणि महापालिका आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्याकडे ही मदत देण्यात आली. कोल्हापुरात करोना संसर्ग रोखण्यासाठी गेले दीड महिना जिल्हा प्रशासन अहोरात्र काम करत आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून शिवाजी विद्यापीठ आणि संजय घोडावत युनिव्हर्सिटी अशा दोन ठिकाणी प्रत्येकी ५०० बेडची करोनाग्रस्तांवर उपचारासाठी अद्ययावत हॉस्पिटल उभी करण्याचा जिल्हा प्रशासनाने निर्णय घेतला आहे. त्यासाठी समाजातील दातृत्वशिल व्यक्ती आणि संस्थांनी मदत करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी केले होते.



## माजी खासदार धनंजय महाडिक यांची मदत

त्यांच्या या आवाहनाला भारतीय जनता पक्ष आणि महाडिक परिवाराने प्रतिसाद दिला आणि या रुग्णालयासाठी १०० बेडस् देण्याची घोषणा केली. त्यानुसार भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष धनंजय महाडिक यांनी जिल्हाधिकारी दौलत देसाई यांच्याकडे १०० बेडस् सुपुर्द केले. 'प्रशासनाला लागेल ती मदत करण्यासाठी भाजप आणि महाडिक परिवार आपल्या सोबत असेल', असे आश्वासन प्रदेश उपाध्यक्ष धनंजय महाडिक यांनी प्रशासनाला दिले.

यावेळी माजी आमदार अमल महाडिक, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रोहीत बांदिवडेकर, उपअभियंता प्रशांत कांबळे, मिलिंद किटवाडकर, नगरसेवक सत्यजित कदम, विजय सुर्यवंशी, विश्वराज महाडिक, समीर सेठ, इंद्रजित जाधव आदी उपस्थित होते.